जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2018
तरुण भारत



कोल्हापूर : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमधील आयोजित कार्यशाळेत डॉ. पी. एस. पाटील यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे. सोबत डॉ. एस. जी. किल्लेदार.

# संशोधन वृत्तीला प्रोत्साहन दिले पाहिजे : डॉ. पी. एस. पाटील

**कोल्हापूर :** उत्तम संशोधनासाठी विद्यार्थ्यांमध्ये पदवीचे शिक्षण घेतानाच आवड व चौकसपणा निर्माण झाला पाहिजे, असे मत डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये अग्रणी महाविद्यालय अंतर्गत 'रिसर्च प्रमोशन ॲक्टीव्हिटी" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांची चौकस बुध्दी असते, असे विद्यार्थी समाजोपयोगी संशोधन करून समाजाला न्याय देवू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शिक्षकांनी त्याचे समाधान होईपर्यंत दिले पाहिजे. डॉ. एस. जी. किल्लेदार यांनी 'रिसर्च सेन्सटाझेशन स्किम" या विषयावर मार्गदर्शन केले. ५१ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, डॉ. एन. आर. जाधव, डॉ. एन. एम. भाटीया, प्रा. डी. व्ही. माहुली, तानिया मेहंतर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2018
Times of India

# SUK ties up with pvt firm to boost students' computer skills

TIMES NEWS NETWORK

File Photo



The firm will organize the 'SEED IT Idol 2018' competition in colleges affiliated to SUK in the first round

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) has joined hands with SEED Infotech, a private firm, to improve computer skills of students.

The firm will organize the 'SEED IT Idol 2018' competition in colleges affiliated to SUK in the first round.

The test, according to the firm's officials, will be based on basic computer skills, which is the part of the IT industries regular recruitment process.


"This is the ninth year of the test and we are excited to be a part of it with the SUK. The test focuses on basic skills of students in computing and programming," Bharati Barhate, executive director of SEED Infotech, said.

"After the first round, the selected students will advance to the second round with tougher questions. For the third and final round, only 10 students will be selected, during which they will appear for a live test before the audience. The final round will be held in the first week of March," she said.

On the response, Barhate said that last year, more than 70,000 students from across the state had appeared for the test. "However we are expecting at least 80,000 students this year. We are seeking universities' support from different parts of the state for the participation of students and it is quite good so far," she said, adding that students from other cities are also going to be part of it.

An official of SUK said, "This is a good initiative to enhance the students' academic skills. The varsity takes various initiatives such as job placements and this kind of exercise will help students acquire basics knowledge."

जनसंपर्क कक्ष
14 FEB 2018 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



रोटरी क्लब ऑफ करवीर व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'मून २०१८' या कार्यक्रमाच्या विजेत्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विशाल जांभळे, आनंद कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

**विजेत्यांचा गौरव :** शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजन

# रोटरी क्लबच्या 'मून २०१८'ची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रोटरी क्लब ऑफ करवीर व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'मून २०१८' या कार्यक्रमाची सांगता झाली. रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते विजेत्यांना गौरवण्यात आले.

यावेळी बोलताना आनंद कुलकर्णी म्हणाले, मून २०१८ मधील अनुभवाचा फायदा यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना पुढील भविष्यासाठी होणार आहे.

## मिस्टर मून २०१८ मधील विजेते

- विश्वजित पाटील (ग्रीस), मोनाली देसाई (भारत).
- फर्स्ट बेस्ट टीम- ऐश्वर्या नरके व निकीता पिसे (संयुक्त राष्ट्र अमेरिका)
- सेकंड बेस्ट टीम - नोमान सय्यद व वैष्णवी कुलकर्णी (मेक्सिको)
- बेस्ट वेशभूषा पुरुष - फैजल शेख (इराक)
- बेस्ट वेशभूषा महिला - हेमल इंगळे (ग्रेट ब्रिटन)
- बेस्ट परफॉर्मन्स इन ब्लॉक मिटिंग - पॅट्रीक पास्कल व ॲलॉय इलेयाज (बुरुंडी), कौशल लधड व श्रुती हंगीरगेकर (चीन), गॉडवीन सेगेरो व लुसी ओकेयो (केनया), कार्मेलिना लिझा फर्नांडिस व वैशाली हण्णुरकर (जपान), आफताब शेख व नितीन चिक्के (रशिया).
- बेस्ट परफॉर्मन्स सांस्कृतिक कार्यक्रम पुरुष : श्रेयस मोहिते.
- बेस्ट परफॉर्मन्स सांस्कृतिक कार्यक्रम महिला : कार्मेलिना लिझा फर्नांडिस.

'मून २०१८'चे जनरल सेक्रेटरी नासिर बोरसदवाला, डॉ. माळी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संग्राम पाटील, क्लबचे अध्यक्ष विशाल जांभळे, सचिव प्रमोद चौगुले, दिलीप शेवाळे, निशिकांत नलवडे, मनोज कोळेकर, दिलीप प्रधाने, ऋषीकेश केसकर, प्रदीप गांधी, आदी उपस्थित होते. प्रशांत मेहता, विक्रांत कदम, अमित माटे, वारणा वडगावकर आदींनी ब्लॉक कौन्सिलर म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2018
पुढारी

# सीड इन्फोटेक, विद्यापीठातर्फे सीड आयटी आयडल उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इंजिनिअरिंग, एमसीएम, एमसीएस, एमसीए, संगणकाशी संबंधित सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'सीड आयटी आयडल २०१८' या उपक्रमाला सुरुवात झाली आहे. 'सीड इन्फोटेक'तर्फे आयोजित या उपक्रमास शिवाजी विद्यापीठाचेही सहकार्य लाभले आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये या स्पर्धेत भाग घेऊ शकतात. संपूर्ण महाराष्ट्रभर गेल्या नऊ वर्षांपासून याचे आयोजन केले जाते.

'सी प्रोग्रामिंग' व 'कॉम्प्युटर फंडामेंटल्स' या विषयीचे विद्यार्थ्यांचे ज्ञान जोखून त्यांना पुरस्काराने सन्मानित करणे, रोजगाराच्या संधींबाबत व आयटी उद्योगात आवश्यक कौशल्यांबाबत विद्यार्थ्यांना जागृत करणे आणि भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षेसाठी त्यांना सज्ज करणे यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांची नोंदणी करण्याचे काम सुरू असून दुसरी व अंतिम फेरी तसेच पुरस्कार वितरण समारंभ मार्च २०१८ च्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. या स्पर्धेतून सर्वोत्तम विद्यार्थ्यास 'सीड आयटी आयडल' हा किताब दिला जातो, दोन उत्तेजनार्थ विजेतेही निवडले जातात. याच पद्धतीने सर्व केंद्रांवर स्पर्धा घेतल्या जातात आणि सर्व विभागीय विजेते नंतर महा आयटी आयडल स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. ही महाअंतिम फेरी मार्चअखेर पुण्यात होईल. या उपक्रमाविषयी सीड इन्फोटेकच्या कार्यकारी संचालिका भारती बऱ्हाटे यांनी माहिती प्रसिद्धीस दिली आहे.

14 FEB 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात 'सीड आयटी आयडल' उपक्रमास प्रारंभ

कोल्हापूर / प्रतिनिधी : इंजिनिअरिंग, एमसीएम, एमसीएस, एमसीए आणि संगणकाशी संबंधित सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला जाणारा 'सीड आयटी आयडल-कोल्हापूर २०१८' या बहुप्रतीक्षित उपक्रमाला कोल्हापुरात सुरुवात झाली आहे. उपक्रमाचे हे यशस्वी ९ वे वर्ष आहे. विद्यार्थ्यांमधील संगणकीय कौशल्याची कसोटी घेतली जाते. 'सीड इन्फोटेक'तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमास शिवाजी विद्यापीठाचेही सहकार्य लाभले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये या स्पर्धेत भाग घेऊ शकतात.

'सीड आयटी आयडल' हा 'सीड इन्फोटेक'तर्फे संपूर्ण महाराष्ट्रभर आयोजित करण्यात येणारा प्रमुख उपक्रम आहे. कोल्हापूरमध्ये 'सीड आयटी आयडल' हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्याने राबवला जातो. 'सी प्रोग्रामिंग' व 'कॉम्प्युटर फंडामेंटल्स' या विषयीचे विद्यार्थ्यांचे ज्ञान जोखून त्यांना पुरस्काराने सन्मानित करणे, रोजगाराच्या संधींबाबत व आयटी उद्योगात आवश्यक असणाऱ्या कौशल्यांबाबत विद्यार्थ्यांना जागृत करणे आणि भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षेसाठी त्यांना सज्ज करणे, असे विविध उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

कोल्हापूरमधील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांची नोंदणी करण्याचे काम सुरू झाले असून, दुसरी व अंतिम फेरी तसेच पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन मार्चमध्ये करण्यात येणार आहे.

'सीड आयटी आयडल'च्या रचनेनुसार पहिल्या फेरीत 'सी प्रोग्रामिंग' आणि 'कॉम्प्युटर फंडामेंटल्स'च्या ज्ञानावर आधारित लेखी परीक्षा घेतली जाते. ही ३० मिनिटांची बहुपर्यायी चाचणी परीक्षा असते. या फेरीतून निवडले गेलेले विद्यार्थी दुसऱ्या फेरीस पात्र ठरतात आणि याही फेरीत वाढत्या काठिण्य पातळीसह परीक्षा घेतली जाते. या फेरीतून १० अंतिम स्पर्धक निवडले जातात. खास या स्पर्धेसाठी बनवण्यात आलेल्या सॉफ्टवेअरच्या मदतीने प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली जाते.

या स्पर्धेतून सर्वोत्तम ठरलेल्या विद्यार्थ्यास 'सीड आयटी आयडल' हा किताब दिला जातो. २ उत्तेजनार्थ विजेतेही निवडले जातात. त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असे स्मार्टफोन्स, हार्डडिस्क्स, चार्जिंग पॉवर बँक्स तसेच 'सीड'च्या कोर्सेसवर सवलत अशा गोष्टी पुरस्काराच्या रूपात प्रदान केल्या जातात. सर्व विभागीय 'सीड आयटी आयडल' विजेते नंतर 'सीड महा आयटी आयडल' स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. ही महाअंतिम फेरी मार्चअखेरीस पुण्यात होणार आहे.

'सीड इन्फोटेक'च्या कार्यकारी संचालिका, भारती बऱ्हाटे म्हणाल्या; 'सीड आयटी आयडल'च्या या यंदाच्या नवव्या स्पर्धेलाही शिवाजी विद्यापीठाने सहकार्य देऊ केले आहे. राज्यभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आणि कौशल्य आहे. फक्त ते जोखण्याची आणि त्यांना आयटी उद्योगात सहभागी होण्यासाठी सज्ज करण्याची गरज आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेत महाराष्ट्रातील ७० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या वर्षीही राज्यभरातील ८० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूरखेरीज पुणे, मुंबई, बारामती, सांगली, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, कोकण, रत्नागिरी, अमरावती, नागपूर, धुळे व जळगाव यासारख्या शहरात 'सीड आयटी आयडल' उपक्रम राबवला जाणार आहे असेही त्यांनी नमूद केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2018
सकाळ



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात शिवानी पाटील हिचा सत्कार करताना निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी. शेजारी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, महेश जाधव, प्राचार्या शुभांगी गावडे आदी.

# 'बी. एस्सी. फिजिक्स विषयात शिवानी पाटील विद्यापीठात प्रथम

## 'विवेकानंद'मध्ये अविनाश धर्माधिकारींच्या हस्ते सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

शिरोली पुलाची, ता. १३ : येथील शिवानी राजू पाटील हिने बी. एस्सी. तृतीय वर्ष फिजिक्स विषयात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरणप्रसंगी सन्मानचिन्ह देऊन स्नामनित केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती अध्यक्ष महेश जाधव, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य एस. वाय. होनगेकर उपस्थित होते. प्रारंभी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. पाहुण्यांची ओळख प्राचार्य साळुंखे यांनी करून दिली.

संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मिलिंद कारंजकर, प्रा. मालगावकर, प्रा. नवाते, प्रा. पट्टणशेट्टी, प्रा. थोरात, प्रा. पाटणकर आदी उपस्थित होते. आभार जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# देशमुख अध्यासनातर्फे उद्या चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कॉ. दत्ता देशमुख अध्यासनच्यावतीने 'दत्ता देशमुख जीवन व कार्य' या विषयावर गुरूवारी (ता. १५) एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी दहा वाजता माधवराव जोगळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचे उदघाटन होणार आहे.

पहिल्या सत्रात दुपारी बारा वाजता 'प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन' या विषयावर बाबा आढाव विवेचन करणार आहेत. तर दुपारी एक वाजता डॉ. भारत पाटणकर हे 'शेतीच्या पाण्याचा प्रश्न' या विषयाची मांडणी करणार आहेत. दुसऱ्या सत्रात दुपारी अडीच वाजता शाहीर डॉ. मोहन देशमुख पोवाडा सादर करणार आहेत.

# है तयार हम...

## 'लोकमत'चे उपक्रम समाजोपयोगी



विविध स्वरुपातील सामाजिक उपक्रमात 'लोकमत'ने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सुदृढ आरोग्य राखण्याचा संदेश देणाऱ्या 'महामॅरेथॉन'चा उपक्रम उल्लेखनीय आहे. पश्चिम महाराष्ट्रातील खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांसाठी एक चांगली संधी या उपक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. हा उपक्रम निश्चितपणे समाजासाठी परिणामकारक ठरेल. प्रत्येकाचे आरोग्य चांगले असेल तर देशही सुदृढ बनतो. ही मॅरेथॉन कोल्हापूरकरांसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. या महामॅरेथॉनच्या माध्यमातून शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि स्वच्छतेबाबत 'लोकमत'ने प्रबोधन करावे.

- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु,शिवाजी विद्यापीठ